## न्यायाधीश रोहिणी आयोग;
## केंद्रीय ओबीसी मधील बारा बलुतेदार आणि भटक्या विमुक्तांना
## मिळणार सामाजिक न्याय.

केंद्र सरकारने 23 ऑगस्ट 2017 च्या मंत्रिमंडळामध्ये केंद्रीय ओबीसी 27% आरक्षणाचे विभाजन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. संविधानाच्या कलम 340 प्रमाणे, मा.राष्ट्रपती महोदयांनी न्यायमूर्ती जी.रोहिणी आयोगाची निर्मिती करून, २ एप्रिल २०१८ पर्यंत, 27% आरक्षणाचे विभाजन शास्त्रीय आणि न्याय्याक पद्धतीने, करण्यात सांगितले. सद्यस्थितीत न्यायमूर्ती रोहिणी आयोग, देशभरातील ओबीसी मधील, जे वंचित आहेत, अर्थातच बारा बलुतेदार म्हणजेच न्हावी,खाती,वाडी,लोहार,सोनार,सुतार, धोबी, शिंपी, कुंभार, तेली, तांबोळी,माळी, गोवारी,गुरव,तसेच भटक्या विमुक्तांन मधील वडर,भोई,बंजारा,धनगर,गोवासी,गवळी,बेलदार,रामोशी,भराडी,गोपाळ, गोंधळी,गारुडी,चित्रकथी,कोल्हाटी,मसणजोगी, तसेच इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय मध्ये कुणबी,कासार, नाभिक,आगरी,कोळी,भावसार,पेंढारी,हलबा,कोष्टी,मांगेला,गुजर,कलाल,भोयर,घंटीचोर,भामटा,परदेशी,फकीर,भराडी, सफेरा,अन्सारी इत्यादी यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य आरक्षणाचा वाटा मिळणार आहे.

देशामध्ये व्ही.पी.सिंग पंतप्रधान असतांना 1993 साली मंडल आयोग लागू करून, केंद्र सरकारच्या नोकरी आणि,शिक्षणामध्ये 27% आरक्षण दिल्या गेले. गेल्या 23 वर्षाच्या अभ्यास केल्या नंतर असे आढळून आले आहे की, UPSC मार्फत भरल्या जाणाऱ्या IAS, IPS, IRS, या पदावर काही ठराविक जातींनीच याचा फायदा घेतला, परंतु वंचितांना याचा लाभ झाला नाही, त्याच प्रमाणे राष्ट्रीयकृत बँका,रेल्वे,पोस्ट ऑफिस,LIC, GIC, पेट्रोलियम कंपनी,इनकम टॅक्स ऑफिस इत्यादी केंद्रीय अखत्यारीत सेवायोजना मध्ये आणि उच्च शिक्षणाच्या भरती मध्ये, केवळ ठराविक आठ-दहा जातींनीच या आरक्षणाचा लाभ घेतला,त्यामुळे देशातील बहुसंख्य बारा बलुतेदार,अठरापगड जाती, भटके विमुक्त,आणि विशेष मागासवर्गीय जातींना 27% केंद्रीय ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळाला नाही हे उघड सत्य आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी 1902 साली आपल्या राज्यात (कोल्हापूर प्रांतात) 50% आरक्षण दिले होते, त्या वेळेस आरक्षणाचे तत्व का लागू केले,या साठी त्यांनी दोन घोड्याचे उदाहरण दिले होते. आणि पटवून सांगितले होते की, दोन घोड्यास एका टोपली मध्ये चने खावयास दिले तर, शसक्त घोडा सर्व चने खाईल, आणि अशक्त घोड्याला काही खाऊ देणार नाही, आणि म्हणून दोन्ही घोड्याला वेगवेगळे टोपली मध्ये चने खायला दिल्यास दोघालाही आपला वाटा व्यवस्थीत मिळू शकेल.

### : सामाजिक न्यायासाठी आ.हरिभाऊ राठोडची देशव्यापी मोट

:ओबीसीच्या विभाजनामुळे शेवटच्या घटकाला न्याय मिळून देणारा मंडल, 2 आयोग आहे, त्यामुळे सामाजिक न्यायाच्या व्दितीय पर्वासाठी ओबीसींचे राष्ट्रीय नेते, आ.हरिभाऊ राठोड सध्या देशव्यापी मोट बांधत आहे. ओबीसींच्या 27 टक्के आरक्षण विभाजनाचे नवे समीकरण क्रांतीकारी ठरू शकते, राठोड यांनी नागपूर अधिवेशना मध्ये विधानभवनात ओबीसी जनगणना संदर्भात निदर्शने करून शासनाचे लक्ष वेधले.ओबीसी मधल्या न्यायवंचित घटकाला संघटित करून ओबीसी विभाजनासाठी देशव्यापी जनजागृती सुरू केले आहे.

हाच धागा पकडून मंडल आयोगामधील एक सदस्य श्री एल. आर.नाईक यांनी आपल्या डिसेंट नोट मध्ये ओबीसी चे 27% चे दोन भाग करावे, आणि अतिमागास समाजाला 15% तर इतर मागासांना 12% असे वर्गीकरण सुचविले होते. मंडल आयोगाच्या शिफारशी प्रमाणे, ओबीसी ना दिलेल्या 27% आरक्षण आणि आर्थिकदृष्टया कमकुवत,

घटकांना दिलेले 10% आरक्षण याला इंद्रा साहनी आणि इतरांनी सर्वोच्च न्यायालयात आवाहन दिले होते, या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयांनी 9 न्यायाधीषाचे संविधानिक बेंच ची स्थापना केली होती, या 9 न्यायाधीशांनी इंद्रा साहनी प्रकरणी, अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय दिला, त्या मध्ये सूचित केले होते की, ओबीसीना जर खरोखरच सामाजिक न्याय द्यायचा असेल तर, ओबीसी 27% आरक्षणाचे विभाजन करण्यात यावे. हाच धागा पकडून गेले 20 वर्ष यांनीं देशभर यासाठी लढा उभारला, आंदोलने केली, आणि 2008 साली लोकसभेत खाजगी बील सुद्धा मांडले, आणि सातत्याने 27% ओबीसी चे विभाजन करावे, अशी मागणी करीत होते. या त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे, हे म्हणायला हरकत नाही.

रोहिणी आयोगा समोर त्यांनी 27% ओबीसीचे विभाजन खालील प्रमाणे करावे, अशी मागणी केली आहे, आणि त्याची चर्चाही देशभर सकारात्मक पणे होत आहे, रोहिणी आयोगाकडे खालील प्रमाणे मागणी सादर केलेली आहे.

**1) विमुक्त जमाती 2) भटक्या जमाती 3) अर्ध भटक्या जमाती 4) पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या जाती (बारा बलुतेदार) 5) अल्पसंख्याक मागासलेल्या जाती 6) अत्यंत मागासलेल्या जाती (SBCआणि अठरापगड ) 7) मागासलेल्या जाती (उरलेल्या इतर मागासलेल्या जाती )**

वरील प्रमाणे विभाजनाचा निर्णय झाल्यास याला देशात मंडल-2 असे नाव दिल्या गेले आहे. व तशी चर्चा आहे, खरोखरच असे झाले तर, या दशकातील सर्वात मोठे न्यायाचे पर्व, या देशात आल्याची जाणीव सर्वांना झाल्या शिवाय राहणार नाही. हे सामाजिक न्यायचे पर्व, केवळ आरक्षणा पुरते मर्यादित राहणार नसून, या सर्व घटकांना वेगळे बजेट, स्कॉलरशिप, कल्याणकारी योजना, वेगळे विकास महामंडळ आणि विविध सोयी सवलती, मिळवून दिल्या शिवाय राहणार नाही, आणि म्हणून न्यायमूर्ती जी.रोहिणी आयोग म्हणजेच भटके विमुक्त, बारा बलुतेदार, अठरापगड जाती, विशेष मागास प्रवर्ग, अल्पसंख्याक ओबीसी यांच्या साठी सामाजिक न्यायचा पर्व ठरेल.

**"ओबीसी, बारा बलुतेदार, भटके विमुक्तांमध्ये या सामाजिक न्याय पर्वासाठी एल.आर.नाईक यांच्या डिसेंट नोट क्रांतिकारी बदल घडवून आणणार आहे. या मंडल 2 आयोगामुळे ओबीसी मधल्या न्यायवंचितास खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय मिळेल असा विश्वास आहे."**

**भटके विमुक्त, आणि बारा बलुतेदार यांना क्रिमिलियर संज्ञेमधून वगळणे बाबत:**
**गेले दशक भर आपण भटके विमुक्त आणि बारा बलुतेदार यांना क्रिमिलियर या संज्ञेमधून वगळणे बाबत लढा देत आहो, सद्यस्थिती मध्ये हे प्रकरण मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रलंबित आहे**

**बढती मधील आरक्षणाचा प्रश्न:मुंबई उच्च न्यायालयानी मागासवर्गीयांच्या बढती मधील आरक्षणाला स्थगिती दिली आहे, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात विचाराधीन असून, येत्या 4 जाने 2018 रोजी पुढील सुनावणी आणि संविधानिक सात न्यायाधीषाचे खंडपीठ स्थापन होईल आणि, एम नागराजन प्रकरणी निकाल दिल्या जाईल. या प्रकरणी मा.हरिभाऊ राठोड यांनी स्वतंत्र याचिका दाखल केली असून, अँड राकेश राठोड आणि अँड डी. पी.राजभर दिल्ली यांच्या मार्फत अँड सिंघवी यांना आपल्या तर्फे उभे करायचे प्रयत्न चालू आहे.**

**आपला,**
**वेदनाकार, एकनाथ पवार**
**लेखक, साहित्यिक- 9850131368**